जिल्हा परिषदेच्या गट- क (वर्ग-३) व गट-ड
(वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांच्या
धोरणाची अंमलबजावणी.

महाराष्ट्र शासन
ग्रामविकास व जलसंधारण विभाग
शासन निर्णय क्रमांक : जिपब- ४१४ / प्र.क्र.११२ /आस्था-१४
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १५ मे, २०१४

वाचा : १) शासन निर्णय, ग्रामविकास व जल संधारण विभाग क्रमांक जिपब०७१२/प्र.क्र.१५५/ आस्था१४, दिनांक १८ एप्रिल, २०१३,

२) शासन शुध्दीपत्रक क. जिपब०७१२/प्र.क्र.१५५/आस्था१४ दिनांक ३०एप्रिल, २०१३,दिनांक ४ मे, २०१३, दि.२९जून,२०१३ व २४ ऑक्टोबर,२०१३

३) शासन परिपत्रक, ग्राम विकास व जल संधारण विभाग, क्रमांक जिपब२६००/प्र.क्र.६९४०/१४, दिनांक २९ मार्च, २००१

<u>प्रस्तावना</u>: उक्त दिनांक १८-४-२०१३ च्या शासननिर्णयान्वये जिल्हा परिषदेच्या गट क व गट ड मधील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे धोरण निश्चित करण्यात आले होते. सदर धोरणाची अंमलबजावणी करताना आलेले अनुभव तसेच सदर धोरणांमध्ये सुधारणा करण्यासंदर्भात शासनाकडे विविध जिल्हा परिषद कर्मचारी व त्यांच्या संघटना यांचेकडून प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने आवश्यक त्या बाबींचा सर्वकष विचार करुन जिल्हा परिषदेच्या गट- क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबतचे धोरण पुढीलप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> : जिल्हा परिषदेच्या गट- क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबतचे उक्त शासन निर्णय /शुध्दीपत्रके / परिपत्रक अधिक्रमित करुन या शासन निर्णयाच्या प्रकरण १ ते ५ नुसार सर्व समावेशक सर्वसाधारण बदल्यांचे धोरण, कार्यपध्दती व निकष निश्चित करण्यात येत आहेत. या निकषानुसार जिल्हा परिषदेच्या गट- क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांबाबतची कार्यवाही करण्यात यावी. या शासन निर्णयाद्वारे पूर्वीच्या धोरणात करण्यात आलेल्या सुधारणा ठळक अक्षरात दर्शवून अधोरेखित करण्यात आलेल्या आहेत.

२. गट- क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या कर्मचाऱ्यांच्या बदल्यांपूर्वी तसेच समुपदेशन प्रसंगी सादर करावयाचा नमुना परिशिष्ट- १ प्रमाणे असेल. त्याप्रमाणे बदलीपात्र/इच्छुकांनी अर्ज सादर करावे. सदर बदल्यांबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यावर सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / गट विकास

अधिकारी यांनी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-२** मध्ये दर्शविलेल्या विहित विवरणपत्रामध्ये माहिती भरुन ती दरवर्षी दिनांक ३० जूनपर्यन्त शासनाकडे पाठवावी.

३. बदलीसंबंधाने कोणत्याही प्रकारची अनियमितता होऊ नये याबाबत विभागीय आयुक्त यांनी दक्षता घ्यावी. विहित पध्दतीनुसार प्रशासकीय बदल्या करणे आवश्यक आहे. अन्यथा कसूर करणारा अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र राहील. बदल्यांबाबतच्या अनियमिततेबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास त्याअनुषंगाने अनियमितता दूर करण्याच्या व अनियमिततेस जबाबदार असणाऱ्याविरुध्द नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही विभागीय आयुक्त यांनी करावी.

४. गट- क (वर्ग-३) व गट-ड (वर्ग-४) च्या बदल्यांसंदर्भात शासन वेळोवेळी आदेश देईल ते आदेश सर्व जिल्हा परिषदांना / पंचायत समिती यांना बंधनकारक राहतील.

५. बदल्यांबाबतची पुढील कार्यवाही या शासन निर्णयात अंतर्भूत असलेल्या दिनांकानुसार करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय संगणक संकेतांक क्रमांक 201405151656129720 अन्वये महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**सोबत :** १) प्रकरण-१ ते ५
२) परिशिष्ट १, २(अ) व २ (ब)

( ग.के. रहाटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२) मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री, ग्रामविकास, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री ग्रामविकास,महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
५) सर्व विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य
६) अपरमुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव,सर्व मंत्रालयीन विभाग
७) विभागीय आयुक्त (सर्व विभाग)
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
९) उपायुक्त (आस्थापना) विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व विभाग)
१०) माहिती व जनसंपर्क संचालनालय यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
११) सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग
१२) निवड नस्ती कार्या क्र.आस्था-१४, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२